# प्रकरण पहिले

## दि.बा. मोकाशीपूर्व कथेचे स्वरूप --

अ - मराठी कथा वाङ्मयाचा विकास

ब - नवकथा

क - नवकथेचे स्वरूप

ड - नवकथेची वैशिष्ट्ये

## प्रकरण पहिले ---

## दि.बा.मोकाशीपूर्व कथेचे स्वरुप --

### अ) मराठी कथा वाङ्मयाचा विकास ---

कोणत्याही भाषेत सुरुवातीच्या काळात कथात्मक वाङ्मयाला जास्त बहर आलेला दिसतो. कथेचा प्राचीन कथा, मध्ययुगीन कहाणी, लघुकथापूर्व गोष्ट, लघुकथा, नवकथा असा उत्क्रांती मार्ग आहे.

मराठी लघुकथा आजकाल झपाट्याने लोकप्रिय होत आहे. काळाची वाढती गरज लक्षात घेऊन कादंबरीच्या तुलनेने लहान असणारा हा लघुवाङ्मयप्रकार लोकांना जास्त सोईस्कर व जवळचा वाटत आहे. म्हणून दा. वि. कुलकर्णी म्हणतात ' कथा हे समग्र वाङ्मयाचे सर्वाधिक स्वाभाविक असे स्वरुप आहे व त्यामुळे ते स्वयंभू, आकर्षक आणि सुंदर रुप आहे.' [१]

मराठी कथेच्या उगमाकडे जात असताना सर्वप्रथम अलिखित स्वरुपातील मराठी लोककथेचा विचार करावा लागतो. कथा-कीर्तन पुराणातील आख्यानकथा याही लोककथाच. या कथाकडून लिखित वाङ्मयाकडे वळत असताना महानुभावीय लेखकांच्या कथेकडे वळावे लागते. 'लीळाचरित्रात' श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनातील कांही प्रसंग कथा रुपाने आले आहेत. चक्रधरस्वामींनी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान सांगताना दिलेले दृष्टांत म्हणजे एकेक छोटी गोष्टच आहे. परंतु मराठीतील स्वतंत्र कथारचनेचा हेतू मनात धरुन लिहिलेला मराठीतील पहिला कथाग्रंथ म्हणजे ' वैजनाथ कलानिधी' हे होय. त्या बरोबरच ' वेताळ पंचविशी' व ' विक्रम बत्तिशी' या सारखे ग्रंथ मराठीमध्ये लिहिले गेले. त्यानंतर कथेने बरीचशी स्वरुप धारण केलेले

दिसते.

इंग्रज भारतात आले व मुद्रणकलेचा भारतात जन्म झाला तेव्हापासून मराठी कथा वाङ्.मयाला बहर आला. खरी मराठी लघुकथा 'करमणूक' पासून सुरु झाली त्यापूर्वीच्या गोष्टी या भाषांतरित,अनुकरणात्मक व अद्‌भुतरम्य अशा होत्या. इ.स. १८०० मध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी श्रीरामपूर येथील छापखान्यात 'मराठी भाषेचे व्याकरण' हे पुस्तक छापले. तेव्हापासून अर्वाचीन मराठी गद्य वाङ्.मयाचा शुभारंभ झाला. त्यानंतर सन १९०६ मध्ये तंजावरच्या सरफोजी राजांनी दक्षिन पंडिताकडून इसापनितीचे मराठी भाषांतर 'बालबोध मुक्तावली' या नावाने प्रसिध्द केले. हेच मराठीत छापलेले पहिले गोष्टीचे पुस्तक. त्यानंतर डॉ.केरी यांनी वैजनाथपंडित यांच्याकडून 'सिंहासन बत्तिशी', 'हितोपदेश,' 'पंचतंत्र', 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' ही भाषांतरित पुस्तके श्रीरामपूरच्या छापखान्यात छापली. तसेच 'हातिमताई चरित्र', 'गुलबकावली', 'गुलछबु' इ.फारशी कथांचा अनुवादित पुस्तकेही प्रसिध्द झाली. यामध्ये मनोहर आणि मार्मिक भाषांतराचा उत्कृष्ट नमुना म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे 'अरेबिअन नाईट्स' हे पुस्तक होय.

हरिभाऊपूर्व कथेत तीन प्रवाह आढळतात. (१) अद्‌भुतरम्य,कल्पनारम्य गोष्टीचा, (२) मनोरंजनासह बोधामृत पाजू पाहणारा, (३) कथेचा उपयोग करून धर्मान्तरासाठी व धर्मोपदेशासाठी प्रयत्न करणारा . मात्र ही तत्कालीन कथा बाल्यावस्थेत होती. तिच्यात केवळ घटना आणि संघर्ष यानाच महत्त्व होते. समाजाचे प्रतिबिंब तित उमटलेले नव्हते. मात्र तिच्यामुळे लोकांना वाचनाची गोडी लागली, शिक्षण प्रसार साधला.

'करमणूक' कालखंडाला हरिभाऊ कालखंड असेही म्हणतात. मराठी कथेला अद्‌भुताच्या आणि अवास्तवतेच्या पकडीतून सोडवून वास्तवाच्या दृष्टिपथात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'करमणूक' नियतकालिकातील हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींनी केले. म्हणूनच दा.वा.कुलकर्णींच्या मते 'हरिभाऊपूर्व कालखंडापर्यन्त मराठी कथेने आपला कथासंसार उभारण्याचा प्रयत्न केला होता, परंतु खऱ्या अर्थाने

कथा सृष्टीचे आद्यप्रवर्तक म्हणून हरिभाऊ आपट्यांचा उल्लेख करावा लागतो.'[२] त्यांच्या कथांतून सत्याचा जय व असत्याचा पराजय झालेला आढळतो. त्या काळात 'लघुकथा म्हणजे लांबीने कमी असणारी कादंबरी' असाच समज असल्यामुळे कथांत प्रसंगांची, पात्रांची गर्दी आहे आणि वर्णनाचाही मालखाळ आहे. उदा. -- काळ तर मोठा कठीण आला' ही कथा होय.

हरिभाऊंच्या गोष्टीचे प्रधान अंश म्हणजे तिचे कौटुंबिक जीवन. पांढरपेशा समाजाची सुखदुःखे, त्यांच्या भावभावना त्यांनी जिवंत रंगविल्या आहेत. त्यांच्या कथा घटनाप्रधान असून कथेतील कुतूहल शेवटपर्यन्त ठेवण्यात ते यशस्वी झाले आहेत. त्यांच्या कथांतील पात्रे बहुतेक पांढरपेशा वर्गातील असतात. त्यांच्या आशा-आकांक्षा, विचार विकार याचे दर्शन घडवितात. क्वचित वेळी 'काळ तर मोठा कठीण आला' सारख्या कथेतून स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बाल विवाहाची अनिष्टता, केशवपनाच्या ज्वलंत चालीतील क्रूरता इ. तत्कालीन सामाजिक प्रश्नांचे दर्शन घडते. म्हणूनच 'हरिभाऊंनी अर्वाचीन मराठी कथेचा पाया घातला'[3] असे कुंमती शेवडे म्हणतात. तर भालचंद्र फडके यांच्या मते हरिभाऊ हे मराठी कथेचे जनक ठरतात. आणि 'लघुकथेच्या आकृतिबंधाच्या संदर्भात मराठीत हरिभाऊ आपटे यांचेच नाव प्रथम घ्यावे लागेल.'[४] असे मधु कुलकर्णी म्हणतात.

हरिभाऊंनी जन्म देऊन रांगत्या केलेल्या कथेला 'मनोरंजनाने' उभी केली. तिला रंगरूप व आकार दिला परदेशीय व परप्रांतीय भाषातील साहित्य मराठीत येऊ लागले. मराठी वाचकवर्गाची झपाट्याने वाढ होऊ लागली. सुशिक्षित स्त्री-पुरुषांची चित्रे या काळातील लघुकथांत अधिकाधिक येऊ लागली. कथेची पूर्वदृष्टी बदलून कथा खऱ्या अर्थाने लघुकथा व्हावयास लागली.

या कालखंडातील वि. सी. गुर्जर हे मराठी कथा अधिक लोकप्रिय करणारे व मराठी कथेला वळण लावणारे एक नामांकित कथाकार होत. त्यांच्या बहुसंख्य लघुकथा अनुवादित आहेत. मुखर्जी, जॅकोब, मार्क ट्वेन या लेखकांचा त्यांच्या लेखनावर प्रभाव पडला आहे. लघुकथेमध्ये मुळांतील सौन्दर्य कायम ठेवून त्यांनी तीवर मराठी साज चढविला आहे. त्याची 'शेवटचे हास्य' ही कथा त्यादृष्टीने उल्लेखनीय आहे.

`त्यामुळे गुर्जरांच्या अनुवादित कथांना रुपांतरीत असे म्हणण्या ऐवजी त्या कथांची कल्पना परकीय आहे एवढेच म्हणणे अधिक योग्य होईल` [५] असे इंदुमती शेवडे म्हणतात.

गुर्जरांनी प्रणयरम्य प्रसंग व प्रणय रम्य भावनांचे चित्रण मराठी कथेत प्रथम आणले. म्हणून इंदुमती शेवडे यांच्या मते `गुर्जरांची ही प्रेमकथा पुढे येणाऱ्या फडक्यांच्या ललित मृदुल प्रणयपीडित कथेची अग्रदूती होती असे म्हणता येते.` [६]

`यशवंत`, `किर्लोस्कर` कालखंड हा लघुकथेच्या दृष्टीने आत्यंतिक उत्कर्षाचा कालखंड आहे. याच कालखंडात ना.ह.आपटे काशीबाई कानेटकर, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के इ. प्रमुख लेखक होते. या कालखंडातील लघुकथेला कादंबरी पेक्षाही अधिक लोकप्रियता मिळाली. तिच्यातील विस्कळीतपणा व पाल्हाळ कमी होऊन ती अधिकाधिक रेखीव होऊ लागली. घटनाप्रधानतेऐवजी स्वभावप्रधानता येऊ लागली. सुशिक्षित मध्यमवर्गीयांपुरती मर्यादित राहिलेली कथा जीवनाच्या विविध स्तरांवर संचार करु लागली. अद्भुतता, कल्पना रम्यते ऐवजी तीत कलात्मकता व वास्तवता प्रकट होऊ लागली. पण लघुकथेला स्वतंत्र व्यक्तिमत्व प्राप्त करुन दिले ते `दिवाकर कृष्ण,` `ना.सी.फडके`, `वि.स.खांडेकर`, `य.गो.जोशी` या नामवंत शिल्पकारांनी. `शॉर्ट स्टोरी` या नावाने युरोप अमेरिकेत विकसित होणाऱ्या साहित्यप्रकाराचा लघुकथेत प्रभाव पडला. आणि फडके, खांडेकर, य.गो. जोशी, बोकील आदि लेखकांनी मराठी लघुकथा आटोपशीर, चटकदार, रंजक, बोधपर अशी बहुरंगी व लोकप्रिय केली.

`नव्या पध्दतीने गोष्टी लिहिणारे पहिले कथाकार` व `करमणूक - मनोरंजन आणि` `यशवंत - किर्लोस्कर` या दोन कालखंडातील दुवा म्हणून `दिवाकरकृष्ण` यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या कथा संख्येने जरी कमी असल्या तरी गुणाने फार मोठ्या आहेत. त्यांच्या कथेतील नायकाला स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. त्यांचे नायक नायिका क्रूर, कठोर अशा नियतीमुळे दु:खे भोगीत असतात. त्या अत्यंत हळव्या मनाच्या आणि भावनाप्रधान, व्यावहारी जगाच्या टीकेला तोंड न देऊ शकणाऱ्या, आत्मसमर्पण करणाऱ्या आणि चटका लावणाऱ्या आहेत.

उदा. `मृणालिनीचे लावण्य`, `अनुराधेचे स्वप्न` इ.

हरिभाऊ गुर्जर यांनी मराठी कथेला बोट धरून पुढे नेले पण दिवाकरांनी मात्र तिला स्वतंत्र आकार, स्वतंत्र आशय व स्वतंत्र व्यक्तिमत्व देऊन स्वत:च्या पायावर उभे केले म्हणून प्रा.माल्चंद्र फडके म्हणतात, `दिवाकर कृष्णांची कथा भरात आलेल्या पोफळीसारखी आहे. पिकलेल्या फणसासारखी दरवळणारी आहे. यात शंकाच नाही. म्हणून तर त्यांना नव्या पध्दतीने गोष्टी लिहिणारे पहिले कथाकार म्हटले आहे.

मराठी लघुकथेला नावारुपाला आणण्याचे कार्य प्रा.फडके व खांडेकर यांनी केले. म्हणूनच या कालखंडाला `फडके-खांडेकर` कालखंड असेही म्हणण्याची पध्दत आहे.

प्रा.ना.सी.फडके यांनी आपली कथा तंत्रशुध्दता,रेखिवता,डौलदारपणा व समर्पकदार भाषा रचना इ.गुणांनी नटविली आहे. कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारकतेने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीकत म्हणजे लघुकथा होय.`[७] `अनेक प्रसंगांची चतुराईने केलेली गुंफण म्हणजे ललित कथा` हे त्यांनी सांगितलेले लघुकथेचे तंत्र होय. लघुकथेची सुरुवात आकर्षक,शेवट परिणामकारक,मध्ये गुंतागुंत, निगरगाठ व उकल यानी उत्कंठावर्धन ही लघुकथेची मूलभूत तत्वे त्यांच्या कथेत तंतोतंत आहेत. खेळकर भाषाशैली,सुटसुटीत वाक्यरचना,चतुर व मार्मिक संवाद आणि भाषाशैलीची विशिष्ट लय इ.गोष्टीमुळे त्यांना लघुकथेच्या बाह्यांगात खरोखरच क्रांती केली. मात्र अंतरंग त्यांना वैचित्र्यपूर्ण बनविता आले नाही.

वि.स.खांडेकर हे या कालखंडातील दुसरे मानकरी ठरतात. लघुकथाकारांत सर्वात अधिक लोकप्रियता त्यांना मिळालेली असल्यामुळे `लघुकथा सृष्टीचे अनाभिषिक्त सम्राट` असा त्यांचा गौरव केला गेला आहे. `रुपककथा, हा नवा कथा प्रकार त्यांनी मराठीत प्रथम आणला.`[८] त्यांच्या कथा फक्त करमणूक करीत नाहीत तर त्या विचार करावयास लावतात. समाजातील आर्थिक विषमता,समाजातील दोन ध्रुव याचे मौलिक व मार्मिक चित्रण ते करतात. त्यांच्या विनोदी कथा व रुपककथा

अतिशय श्रेष्ठ आहेत. प्रा.फडके यांनी मराठी कथेला आकृतिसौन्दर्य दिले तर खांडेकरांनी आशयगर्भता दिली.

याच काळातिल म.गो.जोशी यांच्या कथेचा पिंड फडके व खांडेकर यांच्या कथेपेक्षा फार वेगळा आहे. त्यांच्या कथेने तांत्रिकतेच्या बेडया झुगारुन दिल्या व ` ती स्वत:च्या तंत्राने स्वतंत्रपणे उभी राहिली. म्हणूनच लघुकथेच्या क्षेत्रात य.गो. जोशी यांची कथा वैशिष्टयपूर्ण ठरली आहे.`` ` कौटुंबिक भावकथा ` या नावाखाली भावविवश कथांचा एक आवर्त मराठी कथेत त्यांनी निर्माण केला. त्यांच्या कथेने मराठी कथेला जिव्हाळ्याची नाती सांगितली. त्यांची कथा त्याग भावना, माणुसकी,उदात्त प्रेम जगू पाहणारी आहे. आपल्या कथेतून ते कधि कधी मानवी जीवनातिल गूढ उकलण्याचा प्रयत्न करतात. ` सखाराम,`` दिवाळीची देणगी`, ` समोर पाहणारी मुलगी` या त्यांच्या कथा तर नवकथेची आठवण करुन देतात. म्हणूनच प्रा.स.ग.मालशे त्यांना पहिला मराठी नवकथाकार मानतात.

` उपेक्षितांच्या अंतरंगाचे` दर्शन घडविणारे प्रा.श्री.म.माटे यांचे कथाविश्व अगदी निराळे आहे. त्यांच्या कथेला जुने वळण आहे पण त्यात व्यक्तिगत अनुभूतिचा जिवंतपणा आहे. भावनेचा उमाळा आहे. आणि निरीक्षणाची सुक्ष्मता आहे.ते उपेक्षितांच्या अंतरंगाशी एकरुप झाले व त्यांनी असीम सहानुभूतीने व जिव्हाळ्याने ती चित्रे मांडली.ते स्वत: समाज शास्त्रज्ञ होते. म्हणून त्यांनी दलितांच्या मनोवृत्तिचे व विचारसरणीचे सूक्ष्म व कलात्मक विश्लेषण केले आहे. कथेतिल अति जिव्हाळ्यामुळे व रसपूर्ण भाषाशैलीमुळे त्यांच्या कथा रसिकांना फार आवडल्या. पांढरपेशी कथा बाजूला सारुन ग्रामीण जीवनातिल दारिद्र्याचे चित्रण त्यांनी केले. म्हणूनच त्यांना ` ग्रामीण मराठी कथेचे अग्रदूत` असे म्हटले जाते.

ब) नवकथा --

दुसऱ्या महायुध्दानंतर एकूण समाज जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. आजवर मानलेली सर्व मूल्ये पायदळी तुडविली जाऊ लागली. साहित्याच्या प्रयोजनाचा प्रश्न नव्याने उभा राहिला. मराठी साहित्यातही नवविचाराचे वारे वाहू लागले.

लेखनाचे निकष तपासले गेले. नव्या आशयाचे व अभिव्यक्तीचे अंकुर उगवू लागले. मराठी कथेत ही क्रांतीची चाहूल स्पष्ट दिसत होती. बाह्य घटनेवर भर देण्यापेक्षा घटनेमागची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न सुरु झाला. हळवा ध्येयवाद व फसवा बोधवाद कथेतून काढून टाकण्यासाठी तंत्राचे व मंत्राचे प्रयोग सुरु झाले. कथा अंतर्मुख, काव्यात्म, एकसंघ व उत्स्फूर्त लिहिली जाऊ लागली. अशा प्रकारचे कथालेखन वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे, बी रघुनाथ आदि लेखक करु लागले. त्यांनी मराठी कथेला आकृति सौन्दर्याच्या रिंगणातून बाहेर काढून नवे वळण लावण्याचे कार्य केले.

वामन चोरघडे यांची कथाही दिवाकर कृष्णांच्या कथेशी एका बाजूने नाते सांगते. कारण तिच्यात दिवाकरांची भावनोत्कटता, हळुवारपणा, रेखीवपणा आहे. तर य.गो.जोशींच्या कथेप्रमाणे ती रुढ तंत्राचा त्याग करते. आणि खांडेकरांच्या कथेप्रमाणे ती ध्येयवादी चित्रणात रमताना दिसते. पण या सर्वांहूनही चोरघडयांची कथा स्वतंत्र आहे. भाषेचा, शैलीचा, तंत्राचा, अनुभूतीचा स्वतंत्रपणा तिच्यात जाणवतो आहे. त्यांचा अनुभव उत्कट आहे. त्या कथांतून त्यांच्या बहुरंगी, संपन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. त्यांच्या कथेला अनेक संस्काराचा वारसा लाभला आहे तो संस्कार खेडयाचा, निसर्ग लोकसाहित्याचा, सेवाग्रामाच्या आंदोलनात भोगलेल्या कारावासाचा, विनोबाजींच्या सहवासाचा आहे. त्याची ग्रामीण कथा विदर्भाच्या काळ्या सकस भूमीत उगवलेली आहे. रुजलेली आहे. त्यामुळे ती ज्वारीच्या घोसदार कणासारखी टवटवीत व सकस वाटते.

कुसुमावती देशपांडे यांनी मोजके पण मार्मिक कथा लेखन केले आहे. 'कुसुमावतींनी मराठी कथेला काव्यमयतेचे एक नवीन लेणे प्राप्त करुन दिले'[10] असे प्रा. दा. वि.कुलकर्णी म्हणतात. ते त्यांच्या कथेतील काव्यमयतेमुळे त्यांच्या कथेत जशी काव्यात्मकता आहे तसेच सामाजिकता, नेटकेपणा व अंतर्मुखता हेही गुणधर्म त्यात आहेत. त्याजीवनाकडे, त्यातील सुख दुःखाकडे, स्त्री समस्याकडे सुजाण दृष्टीने पाहतात. चिंतनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव आहे. ते चिंतन

कधी लघुकथेच्या रुपाने, कधी भावचित्र रुपाने, कधी नुसत्या शब्द चित्राद्वारे, कधी लघुनिबंधाद्वारे ,कधी रुपक कथेतून तर कधी व्यक्तिचित्रणाद्वारे व्यक्त होते. त्यांच्या कथांतून होणारे जीवनदर्शन हे विविध स्तरांवरील आहे. त्या त्या पात्रांची सुख-दुःखे,भावभावना रंगविताना त्यांची वृत्ती फुलाहूनही मृदु होते.

वामन चोरघडे व कुसुमावती देशपांडे यांनी एका परीने नवकथेची पूर्वतयारी केली असे म्हणता येईल.

क) <u>नवकथेचे स्वरुप --</u>

१९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरु झाले. महायुध्दामुळे मानवी जीवनमूल्ये नष्ट होऊ लागली,श्रध्दास्थाने कोसळली,माणुसकी लोपू लागली.वैफल्य आणि विकृतीची दाट छाया तत्कालीन मराठी कथेवर पसरु लागली. त्यामुळे १९३९-४० च्या सुमारास मराठी लघुकथेला ओहोटी लागली. मात्र १९४३-४४ नंतर नवे लघुकथा लेखक पुढे आले व मराठी कथा नवे स्वरुप धारण करु लागली.तीमधून जीवनाचे अधिक वास्तव ,सूक्ष्म, विविध पातळ्यांवरुन व भूमिकेवरुन दर्शन घडू लागले. ती माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेऊ लागली. मानवी मनातील दडलेल्या विविध प्रवृत्तींचे व संज्ञाप्रवाहाचे दर्शन घडविण्याची ती धडपड करु लागली. कथानकाची ठरीव बंधने संपून कथा अधिक स्वैर व लवचिक झाली. थोडक्यात आशय व अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत तिने अमूलाग्र बदल घडवून आणला. या लघुकथेचा जाणीवपूर्वक पुरस्कार ' अभिरुची, सत्यकथा,साहित्य' या मासिकांनी केला म्हणून या कालखंडाला ' अभिरुची-सत्यकथेचा ' कालखंड असे म्हटले जाते. सारांश ' १९४५ च्या सुमारास मराठी कथेत नवतेचे प्रवर्तन झाले. ' [१२]

नवकथा म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या मनातली खळबळ, तिच्या एखाद्या भावा--स्थितीचे चित्र किंवा निसर्गदृश्याचे सहजतेने केलेले भावनामय चित्रण व य:किञ्चित क्षुद्र वाटणाऱ्या जीवनातील नाट्य टिपणे होय. पु.मा.भावे यांची ' सतरावे वर्ष', ' माडगूळकरांची ' काळ्या तोंडाची ' गंगाधर गाडगीळांची ' गिचमिड ', ' गुणाकार ' इ. कथा फडके,खांडेकर ,य.गो.जोशी या कथाकारांकडून भिन्न प्रकारच्या होत्या.

आशय आणि अभिव्यक्ती या बाबतीत नवकथा काव्याशी फार सलगी करताना दिसते. त्या कथेचे निवेदन बरेचसे प्रतिमांच्या सहाय्याने केले जाते व त्या प्रतिमा संस्कारांच्या साम्यावर आधारलेल्या असतात. म्हणून नवकथा काव्याच्या खूप जवळ सरकली. उदा. गंगाधर गाडगीळांची 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ', 'तलावातले चांदणे', भावे यांची 'ध्यास', 'एका झाडाचा मृत्यू', गोखले यांची 'कातरवेळ' या सर्व कथांचे कवितेशी खूप जवळचे नाते आहे. 'कथेच्या प्रयोजनाबद्दलची, स्वरूपाबद्दलची व कार्याबद्दलची एक सुजाण कल्पना ह्या कथालेखकांच्या कथालेखनातून नि:संशय व्यक्त होत आहे. तत्संबंधीच्या जुन्या चुकीच्या कल्पना गळून पडत असल्याची अगदी स्पष्ट चिन्हे दिसून येत आहेत.'[१२] असे वा.ल.कुलकर्णी यांनी 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन' या पुस्तकात म्हटले आहे. 'कथेतील कथानक हे भूमितीतल्या आकृती सारखे असावे अशी विशेषत: फडके आणि खांडेकर यांची कल्पना होती. पण नवकथाकारांनी हे ओळखले की ह्या प्रकारच्या कथानकातून कांही विशिष्ट आणि मर्यादित स्वरूपाचे अनुभव व्यक्त होऊ शकतात. आणि पुष्कळदा कथेत कृत्रिमता येते म्हणून कथेतील अनावश्यक पूर्वग्रह त्यांनी निग्रहाने बाजूला सारले. आणि कथानकाच्या विशिष्ट चौकटीत अनुभवांना न कोंबता अनुभवाच्या आकारानुसार कथानकाची रचना केली. आणि जे अनुभव कथानकाद्वारे व्यक्त होऊ शकत नाहीत ते व्यक्त करण्याकरिता त्यांनी कथानक विरहित कथा लिहिल्या.'[१३]

विषय, मांडणी, स्वभावचित्रण, भाषाशैली या सर्व बाबतीत नवकथा वेगळी आहे त्यामुळे कांहींनी नवकथेचे समर्थन केले आहे तर कांहींनी विरोध केला आहे. वा.ल.कुलकर्णी, ना.सी.फडके यांनी नवकथेवर कडाडून हल्ला केला आहे. त्यांच्या मते नवकथा ही किरटी आहे. कथेच्या कक्षा संकुचित करणारी आहे ती विकृतीत रमणारी आहे. ती अश्लीलतेने, बीभत्सतेने आणि अनीतीने नुसती बरबटलेली आहे. पण गाडगीळ म्हणतात, नवकथा जर अशी असती तर एक नवीन टूम म्हणून साहित्यात तिला दोन चार वर्षे महत्व प्राप्त झाले असते. मराठी साहित्यावर इतका मूलगामी परिणाम ती करू शकली नसती. नवकथा म्हणजे काही जुन्या कथेच्या वर्तुळाशेजारी काढलेले एक छोटेसे वर्तुळ नव्हे. नवकथा हे एक मोठे वर्तुळ आहे.

साहित्य आणि लघुकथा या विषयीच्या चुकीच्या कल्पनांवर जुनी कथा आधारलेली होती. या उलट नवकथा ही कथा आणि साहित्य या विषयीच्या अधिक शुध्द आणि व्यापक कल्पनावर आधारलेली आहे. कथानक, नाट्यपूर्ण घटना, व्यक्तिचित्रे, काव्यात्मकता आणि तत्वचिंतन या गोष्टींचा नवकथेने कधी अव्हेर केला नाही. पण नवकथाकारांनी कथानकाविषयीची कल्पना अधिक लवचिक केली. अनावश्यक पूर्वग्रह नवकथाकारांनी निग्रहाने बाजूला सारले. आणि कथानकाच्या विशिष्ट चौकटीत अनुभवांना न कोंबता अनुभवाच्या आकारानुसार कथानकाची रचना केली. कांही अनुभव व्यक्त करण्यासाठी त्यांनी कथानकविरहित कथा लिहिल्या. नाट्यपूर्ण प्रसंगाचेही नवकथाकारांना वावडे नाही. माडगूळकरांच्या अनेक कथात नाट्य ओतप्रोत भरलेले आहे. पण ते खांडेलकरी सरळसोटपणे अगर खांडेकरी कृत्रिमतेने व्यक्त होत नाही.

नवकथाकारांनी व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत मराठी साहित्याला विकसित केले आहे. निरनिराळ्या वयोगटातील, थरातील, स्वभावविशेषांनी युक्त अशी अनेक माणसे नवकथातून वापरताना दिसतात. नवकथाकारांनी व्यक्तिचित्रणात नुसती विविधताच आणली नाही तर मानवी व्यक्तिमत्वाच्या स्वरुपाविषयी अधिक सखोल अशी जाणीव त्यांनी मराठी साहित्यात आणली. माणसाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन आपल्या कथांतून मराठी वाचकाला घडविले.

ड) नवकथेची वैशिष्ट्ये ---

नवकथा जुन्या कथेपेक्षा कितीतरी अधिक संपन्न व श्रेष्ठ दर्जाची आहे. तिला श्रेष्ठ दर्जा ज्या वैशिष्ट्यामुळे प्राप्त झाला ती नवकथेची वैशिष्ट्ये अशी ----

१) वास्तवता --

नवकथेचा पहिला विशेष म्हणजे तिच्यातील वास्तवता. वास्तवतेचे उघडे-नागडे दर्शन नवकथाकार करतात. लैंगिक प्रवृत्तीचे उघडे-नागडे दर्शन नवकथेतून झाल्यामुळे अनेक टीकाकारांनी ती किळसवाणी, विकृतीने पछाडलेली आहे असे आरोप केले. पण ते अयोग्य आहेत. कारण नवकथाकारांचा दृष्टिकोण हा वास्तववादी होता. तो अनुभवांशी इमान राखतो. त्याचा

सर्व अंगानी प्रत्यय करून देतो. म्हणजेच ' अनुभव निष्ठा ' राखणे हे या नवसाहित्याचे मुख्य प्रयोजन आहे.

२) मनोविश्लेषण --

नवकथेचा हा दुसरा विशेष आहे. मानवी मन ही अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट आहे याची जाणीव या नवकथेला प्रथम झाली. याचा अर्थ यापूर्वीच्या कथेमध्ये ही जाणीव नव्हती असा नव्हे कारण हरिभाऊंना मनातल्या गुंतागुंतीची अंधुक व अस्पष्ट अशी जाणीव होती.पण ती मर्यादित होती. मात्र नवकथेने मानवाच्या मनातील नेणिवेचा प्रांत व अनुभवाचे समिश्र रुप प्रथम मांडले . ' मानवी मनावर ' क्ष ' किरणांचा प्रकाश टाकल्यामुळे नवकथेचे जीवनदर्शन ही मूलगामी झाले. '[१४] नवकथे अगोदरच्या कथालेखकांनी कथेच्या क्षेत्रात तंत्रासारखे रुढ संकेत पाळले होते.पण हे सर्व संकेत नवकथेने झुगारुन कथेचे अंतरंग व बहिरंग बदलले.कथेचा आशय व घाट यांच्यातील अभिन्नत्वाची जाणीवही निर्माण केली.

३) भाषा --

नवकथेचा तिसरा विशेष म्हणजे त्यातील वैशिष्ट्यपूर्ण भाषा. ती तार्किक भाषा नाही की वर्णनात्मक नाही. तर ती सूचनात्मक व संस्कारप्रधान अशी आहे. विविधरुपी व अनेकपदरी अनुभव ज्या प्रतिमांतून बोलका होतो त्या प्रतिमांच्या माध्यमातून ती आपला आशय मांडते. नेहमीच्या व्याकरणनिष्ठ व केवळ जाणिवेचे व विचारांचे वहन करणाऱ्या भाषेचे माध्यम नवकथेच्या अनुभवाला थिटे पडले. म्हणून तिला स्वतःची परिभाषा शोधावी लागली व ती तिने शोधून काढली.

४) तंत्रविषयक कल्पना --

नवकथेचे अंतरंग बदलल्यामुळे तिचे बहिरंगही अपरिहार्यपणे बदलले गेले. नवकथेचा आशय अधिक गुंतागुंतीचा असल्यामुळे पूर्वीच्या कथा-तंत्राच्या साच्यात तो बसणे शक्य नव्हते. त्यामुळे तिला पूर्वीच्या कथेचे सारे नियम मोडावे लागले.तंत्रविषयक कल्पनेत कलाही कारागिरी नसून ती निर्मिती

आहे. या जाणिवेमुळे तंत्राचा विशिष्ट साचा नवकथेने अमान्य केला.तसेच निवेदनाच्या वेगवेगळ्या पध्दतीही नवकथेत आल्या.कारण कथेच्या आशयाला अनुभवाच्या अनेक पातळ्यांवरून निवेदन केल्यामुळे त्या पध्दती येणे अपरिहार्य होते.

इ) काही प्रमुख नवकथाकार --

गाडगीळ, गोखले,भावे व माडगूळकर यांचाच १९४५ नंतरच्या लेखनात आघाडीचे कथालेखक म्हणून उल्लेख करावा लागतो. याचे कारण नवकथा ही १९४५ नंतरची मराठी लघुकथेच्या विकासक्रमातील अत्यंत भूषणावह अवस्था. कथा लेखनासंबंधिचे सारे कृत्रिम,तांत्रिक संकेत तिने झुगारून दिले आहेत. ` मराठीतील खरी वास्तववादी आणि खरी कलात्मक कथा मुख्यत: नवकथेच्या रूपाने प्रकट झालेली आहे.`[१५] येथे आपणास प्रमुख नवकथाकारांचा विचार करावयाचा आहे.

(१) गंगाधर गाडगीळ --

गंगाधर गाडगीळ यांना नवकथेत फार मानाचे स्थान मिळाले आहे. दुसऱ्या महायुध्दाने उद्ध्वस्त केलेल्या जीवनाचे व त्यातून भ्रमनिराश होऊन बाहेर पडलेल्या माणसांच्या नव्या वैचारिक व वाङ्मयीन जाणिवेचे प्रतिबिंब गाडगीळांच्या कथेत पाहावयास मिळते. त्यांनी कथेत जाणिवपूर्वक व बेडरपणे नवनवे प्रयोग करून कथेच्या रंगरूपाची कल्पनाच बदलून टाकली. त्यांच्या कथेचे स्वरूप,चेहरा मोहरा अगदी भिन्न आहे. त्यांच्या कथेतील आशय व तिरपा अविष्कार यामुळे त्यांची कथा वादाचा विषय बनली. व्यक्तींच्या मनात दडलेल्या विविध प्रवृत्तीचे सूक्ष्म दर्शन त्यांच्या कथेतून घडते. त्यांची बहुतेक पात्रे एकाकी आहेत. त्यांना आयुष्य हा सापशिड्यांचा खेळ भासतो. त्यात सामाजिक शक्तीच्या संघर्षातून विकृत बनलेली किडलेली माणसे दिसतात. मर्ढेकरांप्रमाणेच गाडगीळांनाही जन्म-मृत्यूचे अर्थहीन चक्र अस्वस्थ करते. व्यक्तींच्या अंतर्मनात दडलेल्या अतिप्रबळ अशा कामभावनेचे चित्र ` उंट आणि लंका `, ` विळखा ` या कथेद्वारे घडते, तर कधी कधी भावानुभावाशी एकतानता व एक - रूपता झाल्याने ` तलावातले चांदणे `, ` चक्र ` सारख्या भावकाव्यात्मक कथा

निर्माण होतात. म्हणूनच 'गंगाधर गाडगीळांनी मराठी कथेला तंत्राच्या व अविष्काराच्या नव्या वाटा दाखविल्या. त्यांनी कथेतील अविष्काराचे वेगळे लावण्य आणि जाण सिध्द केली ' [१६] असे मधु कुलकर्णी म्हणतात.

गाडगीळांच्या कथेत माणसाचे मन केन्द्रस्थानी आहे. त्यांनी स्वत:च्या निरीक्षणाने, कलावंताच्या निर्लेप दृष्टीने आणि जन्मजात प्रचंड प्रतिभेच्या बळावर माणसांची विविध रुपे चित्रित केली. माणूस बाह्य व्यवहारात जसा दिसतो तसा अंतरी असतोच असे नाही. या त्याच्या गूढ व अनाकलनीय स्वरुपाचे दर्शन गाडगीळांनी घडविले. माणसाच्या मनाच्या तळकोपऱ्यावर त्यांनी झगझगीत प्रकाश टाकला. त्यांच्या कथाविश्वात दरिद्री जीवन जगायला भाग पाडलेल्या व त्यामुळे किडलेल्या माणसापासून ते श्रीमंतीने सडलेल्या माणसापर्यन्त विस्तृत पट आढळून येतो. 'संस्कृती म्हणजे स्वास्थपूर्ण समाजाच्या जीवनावर आलेला फेस आहे' [१७] असे त्यांना वाटते. गाडगीळ जितक्या समर्पित तन्मय व हळूवार काव्यात्मक वृत्तीने माणसाच्या उत्कट गाईच्या भावनेचे क्षणचित्र रेखाटतात, तितक्याच निर्भयतेने माणसाच्या क्षुद्रतेचा कडवट व जहरी उपहासही करु शकतात. म्हैकरांनी म्हटल्याप्रमाणे, 'गाडगीळांचा रंगफलक निराळा, त्यांचे कुंचलेही निराळे त्यामुळे वास्तववादाची एक वेगळी दृष्टी घेऊन त्यांची कथा अवतरली.' [१८]

गाडगीळांच्या कथेचा परीघ मर्यादित आहे. त्याची कथा शहरी माणसांच्या जीवनाभोवती गरगर फिरताना दिसते. तेथील माणसांचे बंदिस्त जीवन, त्यांची मेलेली, किडलेली मने, त्यांचे फाटके संसार आणि हेव्यादाव्यातून जन्मणारे क्षुद्र दु:खाचे गुणाकार, दुबळ्या भावनांचे लपंडाव, शाळा-कॉलेजात जाणाऱ्या तरुणांची रिकामी मने गाडगीळ रंगवितात.

गाडगीळांची भाषा कधी काव्यात्म असते, तर कधी उपरोधिक, कधी अल्लड तरुणीसारखी, तर कधी चिंतनात्मक गंभीर . त्यांच्या कथेत उपमा, उत्प्रेक्षा, रुपके येतात. पण ती आशयाचा एक भाग म्हणून अलंकारासाठी नव्हे.

२) <u>अरविंद गोखले --</u>

गाडगीळांच्या कथेतील माणूस हा अधिक व्यक्तीवादी, उखडलेला, कांहीसा एकलकोंडा, तर गोखल्यांच्या कथेतील माणूस कुटुंबपध्दतीत वाढलेला, भावबंधानी बांधलेला, बुध्दीपेक्षा भावनांशी व्यक्तित्व संघटित केलेला आहे त्यामुळे त्यांची कथा भावनातील माणसाला अधिक आपलीशी वाटते. जीवनात पराभूत झालेल्या, होरपळलेल्या व एकटेपणाने जगणाऱ्या माणसांचे चित्रण गोखले करतात. तरीही जीवन अर्थशून्य, विसंगत आहे अशी ते जाणीव देत नाहीत. सामान्य माणसातील विचित्रपणा, वेगळेपणा, विशिष्टपणा शोधण्याकडे त्यांची प्रवृती असते. `चमत्कृती, अनुभूती व प्रगती` या गोष्टी एकत्र करुन उत्कृष्ट कथा बनते असा विश्वास ते व्यक्त करतात. त्यांची कथा माणसाच्या अंतर्विश्वाचा शोध घेते. त्यामुळे ती अधिक संवेदनशील, सूक्ष्म आणि भावतरल बनली आहे. त्यांच्या प्रारंभीच्या कथेवर खांडेकर, घोरपडे, जोशी यांचे संस्कार होते पण `उन्मेश` कथा संग्रहानंतर त्यांची कथा पूर्ण बदलली.

गोखले यांचे कथाविश्व व्यापक आहे. ते वैचित्र्याने, वैपुल्याने समृध्द झाले आहे त्यांची कथा महायुध्द, बेचाळीसची चळवळ, देशाची फाळणी, जातीय दंगे अशा सामाजिक घटनांच्या पार्श्वभूमीवर उभी राहिलेली दिसते. त्यांच्या कथेने राजेमहा - राजांच्या रंगमहालापासून ते झोपडपट्टीतील जीवनापर्यन्त आणि पुण्यवान असामान्य व्यक्तीपासून ते पतित, तिरस्कृत वेशा जीवनापर्यन्त सर्वत्र संचार केला आहे.

त्यांच्या कथेचा व्यक्ती हा केन्द्र बिंदू आहे. त्या व्यक्ती विविध प्रकारच्या, विविध स्तरावरील आहेत. स्त्री जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कथेतून स्त्री मनाचा हळवारपणा, त्यांच्या निष्ठा, प्राक्तनाशी झुंजण्याची आणि परिस्थितीशी तडजोड करण्याची वृत्ती, प्रेमाच्या स्मृती जपण्याची वृत्ती इ. भाव तरंगांचे मोहक, चित्रण येते. त्यांच्या कथेत रिक्त जीवन जगणारी `रिक्ता` जशी आहे, तशीच अमोगी `अंबाका` आहे. जशी तुळशीपत्रासारखी साध्वी `जयश्री` आहे, तशी विलक्षण अशी `नंदिनी` आहे. यांत्रिक व भ्रष्ट जीवनात स्वत:च्या भावनांना जपणारी केविलवाणी धडपड करणारी जशी `मजुळा` आहे, तशीच शरीर

क्रियाचा भोग वाटयाला येऊनही माणूसकीला पारखी न झालेली अस्मन आहे.

गोखल्यांच्या कथेबद्दल इंदुमती शेवडे म्हणतात व्यापक कथाविश्व, संस्मरणीय व्यक्तिचित्रे,परमन प्रवेशाचे सामर्थ्य, पात्रांचे बहुरंगी मनोदर्शन, विविध प्रकारचे जीवन दर्शन सामान्यावर असामान्यत्वाचा प्रकाश टाकणारी दृष्टी ,कथे विषयीची निरपेक्ष भूमिका अशा अनेक गुणांमुळे गोखल्यांची कथा आज मानाचे स्थान मिळवून आहे. नवकथेला घडविण्यात व तिला संपन्न करण्यात त्यांचा वाटा फार मोठा आहे. [१९]

३) पु.भा.भावे --

पु.भा.भावे यांना नवकथेत खरे अग्रस्थान मिळाले ते त्यांच्या सतरावे वर्ष सारख्या कथेमुळेच. प्रारंभी नवकथेचे समर्थन करणाऱ्या भाव्यांनी नवकथेविरुध्द शस्त्र उपसले. मात्र त्यांची कथा जुन्या कथेशी अनेक बाबतीत नाते राखून असली तरी नवकथेचे सर्व गुण त्यांच्या कथेत आहेत. हे नाकारून चालणार नाही. अ.ना.देशपांडे यांच्या मते, जुन्या परंपरागत जीवनमूल्याबद्दल आदर आणि नव्या सुधारणाबद्दल व संस्कृतीबद्दल निरस्कार हा त्यांचा विशेष आहे गंगाधर गाडगीळ यांनी आपल्या खडक आणि पाणी या पुस्तकात भावेबद्दल ते मुख्यत: प्रेमाचे लेखक आहेत [२०] असा उल्लेख केला आहे. त्यांच्या सर्वोत्कृष्ट कथा ह्या प्रेमकथा आहेत. प्रेमभावनेच्या अनेक अंगाचे चित्रण त्यांच्या कथेत येते.

भावे यांची कथा वैविध्यपूर्ण आहे. सतरावे वर्ष या कथेत ते सतराव्या वर्षात पदार्पन करणाऱ्या पौगंडावस्थेतील मुलांच्या मनाचे पापुद्रे जितक्या अलगपणे उकलून दाखवितात तितक्याच हळूवारपणे वैरी या कथेत तीन चार वर्षाच्या बालकाचे मनोविश्लेषण ते करतात. मानवाच्या प्रणयभावनेची विविध रूपे समेवर, स्वप्न इ. कथेतून ते जसे आपल्या समोर मांडतात तसाच कामक्षुधेचा व अन्नक्षुधेचा विरूप प्रांत ते फुलवा , चार मूठी तांदुळ इ.कथेतून उघड करून दाखवितात. ते कधी फाटलेले आकाश , साडी सारख्या कथेतून मानवातील पशुत्वाचे, हिस्त्रपणाचे तांडव रंगवितात, तर कधी मानवी मनाच्या भव्यतेचे, उदात्ततेचे दर्शन घडविताना दिसतात.

भाव्यांची कथा आत्मनिष्ठ आहे. ते आपल्या ब-याच कथेत ` मी ` च्या रुपाने वावरताना दिसतात. याचा अर्थ आवश्यक त्या प्रमाणात बहुरुपीपणा व परमनप्रवेशाची सिध्दी त्यांना लाभलेली नाही. त्यांच्या कथेत नैसर्गिक विकास साधलेला आहे. ती पिरॅमिडसारखी वाटते. त्यांच्या कथेतील तपशील हा जाणीवपूर्वक असतो. कथेचा अनपेक्षित कलाटणी देऊन केलेला शेवट हे त्यांच्या कथा तंत्राचे खास वैशिष्ट्य आहे. त्यांची भाषाशैलीही सामर्थ्यवान आहे. भावनेनुसार ती रंगरुप बदलते. रसानुरुप शब्दकळा पालटते, त्यांच्या वाक्यात लय,ताल असतो.

भाव्यांची कथा बहुरंगी आणि बहुअंगी आहे. ती कोणताच विषय वर्ज्य मानीत नाही. ती आशयानुसार तंत्र मानते . मनोविश्लेषण,जीवनविषयक प्रौढ जाणीव या गोष्टी तिच्यात आहेत.त्यांच्या कथेचे स्वरुप विविध आहे. त्यात कधी प्रणयाची उद्दाम भावना आढळते, कधी सामाजिक मनाचे दर्शन घडते,तर कधी ती काव्यात्मवृत्तीचा फुलोरा फुलवून बसलेली आढळते. त्यांची कथा भव्य चिरेबंदी वाङ्मयासारखी आहे. ती जुने आणि नवे सामावून घेते.

४) व्यंकटेश माडगूळकर --

माडगूळकरांची कथा म्हणजे नवकथेचा आणखी एक वेगळ्या जातीचा फुलोरा होय. रचना, निवेदनशैली,भाषा, तिच्यातील पात्रे, तिचे कथाविषय हे सारेच अगदी स्वतंत्र प्रकारचे आहे. ` माणदेशी माणसे `, ` गावाकडच्या गोष्टी `, ` काळीआई `, ` जांभळीचे दिवस ` या सर्व कथा संग्रहातील कथांतून माडगूळकरांनी एक निराळीच सृष्टी उभी केली आहे. त्यातून एका ग्रामीण परिसराचे माणदेशाचे जीवन रंगविले आहे. माणगंगेच्या परिसरातील माणसांचे दारिद्र्य, भोळेपणा,अंधश्रध्दा व वेड्या समजुती, त्यांच्या वाट्याला येणारे भोग व ते भोगतानाची त्याची वृत्ती, त्याचे साधेभोळे तत्वज्ञान यातून जणू त्यांचे संपूर्ण जीवनदर्शन माडगूळकर घडवितात.

माडगूळकर ग्रामीण जीवनाकडे ग्रामीणांच्या दृष्टीतून पाहतात. म्हणून त्यांची कथा अस्सल ग्रामीण आहे.माणदेशाच्या मातीतच जणू ती उगवलेली आहे. त्या मातीवरच तिचा पिंड पोसला आहे. त्या प्रदेशातील माणसे,त्यांची भाषा,

जीवन जसेच्या तसे त्यांच्या कथेत येते. माणदेशी जीवनाशी ही कथा इतकी एकरूप झाली आहे की तेथील माणसेच आपली गोष्ट सांगत आहेत असे वाटते. त्यामुळे ती कथा अत्यंत जिवंत व समर्थ झाली आहे. तेव्हा ` माडगूळकरांची कथा कथाप्रधान आहे. तंत्राबद्दलची जी कल्पना पूर्वीच्या लेखकांनी करून ठेवली होती ती माडगूळकरांच्या कथेत दिसत नाही.` [२१] असे इंदुमती शेवडे म्हणतात.

माडगूळकर आपल्या बहुतेक कथांत ` मी ` रूपाने वापरतात. मात्र त्यांचे लेखक मात्र आत्मकेन्द्रित नाही. ते वस्तुनिष्ठ आहे. त्यांच्या नंदनवनाचा परीघ जरी लहान असला तरी तो संपन्न व वैचित्र्यपूर्ण आहे. त्यात अनेक प्रकारची माणसे येतात. भोळी, गरीब, लोभी, कष्टाळू, लबाड, कामचोर, बेरकी, इमानी, दुष्ट, छटेल अशा सर्वप्रकारच्या माणसांनी त्यांच्या कथेचे विश्व गजबजलेले आहे. त्यात बकरीवानी पाला-पाचोळा खाऊन जगणारा धर्मा रामोशी आहे. तर ` जल्मभर असंच दळिद्री राहून आम्ही मसणवटीला जायचं. देवा, चांडाळा का रे असं ? असे विचारणारा रामा मैलकुली आहे. दारिद्र्याने बेरकी, मुर्दाड बनलेला शिदा चांभार आहे, तर इमानाने गावची चाकरी करणारा देवा सखा महार आहे. अजाण, भाबडी कमळी आहे. तशीच उनाड आणि ढालगज गोकुळा आहे. तांबव्याचे पजे पकडणारी बहाद्दर लक्ष्मी आहे, तशीच स्वतःचे व्यक्तिमत्व असलेली गाढवे, कुत्री, मेंढी ही मुकी जनावरे सुध्दा आहेत. म्हणूनच मधु कुलकर्णी त्यांच्याबद्दल म्हणतात, ` आशय आणि अभिव्यक्ती यांची मूस बनविण्यात व्यंकटेश माडगूळकर अतिशय यशस्वी झाले. ग्रामीण लेखन, ग्रामीण कथा खऱ्या अर्थाने मराठीत समर्थपणे व्यक्त केली ती व्यंकटेश माडगूळकरांनीच ` [२२]

गाडगीळ दशकांच्या छायेत लेखन करणारे प्रमुख कथाकार म्हणजे सदानंद रेगे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, वसुंधरा पटवर्धन, दि.बा.मोकाशी, शंकर पाटील, द.मा. मिरासदार इत्यादी होत.

नवकथेच्या शिल्पकारांची चार नावे ठरलेली होती ती म्हणजे गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर आणि पाचवे म्हणून कधी कधी मोकाशींचे ही नाव घेतली जायचं. अरविंद गोखले यांनी देखील दि.बा.मोकाशींच्या कथेचा गौरव केला

आहे प्रसंगी आपल्या आधीचा मान त्यांना मिळावा असही त्यानी सूचित केलं. मोकाशींना कितवं स्थान द्यावयाचं यापेक्षा त्यांच्या कथेचं मूल्यमापन करून त्या काळातील ते एक श्रेष्ठ कथाकार कसे होते हे त्यांच्या 'आमोद सुनासि आले', 'लामणदिवा', 'पाचहजार गायी' या कथासंग्रहाच्या आधारे या लघुप्रबंधिकेत शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

विशेषा म्हणजे सरिता पदकी नाही दि.बा.मोकाशींची कथा आस्वादल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, 'ते कितवे होते हे मला माहीत नाही. पण सतत उत्कृष्ट दर्जाची कथा इतक्या काळपर्यन्त लिहित राहिलेले तेच एकटे होते'.[२३]

त्यांची कथा साधी, सरळ पण गहिरी, जकिनाऱ्या एखाद्या वेगळ्या पैलूचं दर्शन देऊन जाणारी होती. त्यांच्या सर्वच लेखनात एक अनाग्रही अशी धारेवी जाणवते. अ-वाद हाच त्यांचा वाद होता.

## संदर्भ


१ प्रा.दा.वि.कुलकर्णी - मराठी कथा : स्वरुप आणि आस्वाद - पृ.६१
स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, ५६७
सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती जून १९७६

२ प्रा.दा.वि.कुलकर्णी - मराठी कथा : स्वरुप आणि आस्वाद - पृ.१६८

३ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ.१५५
सोमैया पब्लिकेशन्स प्रा.लि., मुंबई : दिल्ली, १९७३

४ मधु कुलकर्णी - ललित साहित्यातील जडणघडण - पृ.१२०
शुभदा सारस्वत पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे-५

५ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ.१८१

६ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ.१७५

७ प्रा.ना.सी.फडके - लघुकथा लेखन :मंत्र आणि तन्त्र - पृ.२७
कॉनिस प्रकाशन, पुणे-पहिली आवृत्ती, ऑगस्ट १९५२

८ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ.२४७

९ प्रा.दा.वि.कुलकर्णी - मराठी कथा स्वरुप आणि आकार - पृ.२७०

१० प्रा.दा.वि.कुलकर्णी - मराठी कथा स्वरुप आणि आकार - पृ.३०३

११ डॉ.सुधा जोशी - मराठी भाषा आणि साहित्य - पृ.३३

१२ वा.ल.कुलकर्णी - वाङ्मयीन दृष्टि आणि दृष्टिकोन - पृ.११९
पॉप्युलर प्रकाशन मुंबई-७, प्रथम आवृत्ती सप्टेंबर, १९५९ .

१३ गंगाधर गाडगीळ - रौप्य महोत्सव विशेषांक ऑक्टोबर १९५९ - पृ. ५
मनोहर मासिक

१४ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ. ४१०

१५ अ.ना.देशपांडे - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - पृ. ५७६
खंड २ - व्हीनस प्रकाशन,पुणे
पहिली आवृत्ती १९५८

१६ मधु कुलकर्णी - ललित साहित्यातील जडणघडण - पृ. १३१

१७ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ. ३६५

१८ प्रा.दा.वि.कुलकर्णी - मराठी कथा : स्वरूप आणि आस्वाद - पृ. ३३४

१९ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ. ३९२

२० गंगाधर गाडगीळ - खडक आणि पाणी - पृ. १८७
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती,
१९६६.

२१ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ. ४०७

२२ मधु कुलकर्णी - ललित साहित्यातील जडण घडण - पृ. १२२

२३ सरिता पदकी - ललित - ऑगस्ट १९८१ - पृ. ४६